# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड डि.सी.आर. दिनांक ०५/०७/२०१८**

## १)गळफास घेवुन मृत्यु :-

**रामतिर्थ :-** दिनांक ०४.०७.२०१८ रोजी चे २२.५० वा.चे सुमारास शिवाराज शंकर येदणे यांचे शेताचे लिंबाचे झाडास रामतिर्थ शिवार, ता. बिलोली जि.नांदेड येथे यातील **मयत नामे शिवलींग नागोराव भगतापुरे, वय २५ रा. रामतिर्थ ता. बिलोली**. हा शेतातील धुऱ्यावरील लिंबाचे झाडास पॅन्ट शर्टने गळफास घेवुन मृत्यु पावला. वगैरे **खबर देणार अरुण माधवराव शिंदे, वय ३५ वर्षे व्यवसाय ड्रायव्हर रा. दुगाव ता. बिलोली** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. रामतिर्थ** आ.मृ. ११/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/१९७४ साबळे, मो.क्र.** ०२४६५-२६७१०१ हे करीत आहेत**.**

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.

**" स्थानिक गुन्हे शाखेकडुन मोटार सायकल चोर अटक "**

दि.०५.०७.२०१८ रोजी दूपारी १३.३० वा. गूप्त बातमीदाराकडून माहीती मिळाली की, संशईत इसम नामे बापूराव यलाप्पा गोरे रा. मगनपूरा, नांदेड याच्याकडे चोरीची स्पेलंडर मोटार आहे, अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने स. पो. नि. भारती व स्टाफ असे खाजगी वाहनाने वरील नमूद संशईत आरोपींच्या शोधकामी नांदेड शहरात व सांगवी येथे रवाना झालोत. सदर पथक आरोपीचा नांदेड शहरात शोध घेत-घेत सांगवी ता. जि. नांदेड येथे आले असता, झोपडपटटी सांगवी येथे सदर आरोपी त्याच्या एक स्पेलंडर मोटार सायकल क्र. एम. एच. २९ जे-८७१७ जिचा चेसीस नं. 03L16C28074 व इंजिन नं. 03L15M17573 असलेली मोटार सायकलसह मिळून आला. त्यास त्याचे ताब्यातील सदर मोटार सायकलच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, त्याने सदरची मोटार सायकल एमएसईबी ऑफीस समोरून, साठेचौक नांदेड येथून काल दि. ०४.०७.२०१८ रोजी सायंकाळी चार ते पाच वाजण्याचे दरम्यान चोरून आणली असल्याचे सांगितल्याने सदर मोटार सायकल दोन पंचांसमक्ष जप्त करण्यात आली आहे. सदर मोटार सायकल चोरी प्रकरणी पो. स्टे. शिवाजीनगर नांदेड येथे गूरनं १५५/१८ कलम ३७९ भादंवि प्रमाणे गून्हा दाखल असल्याने सदर आरोपीस जप्त मोटार सायकलसह पूढील कायदेशीर कार्यवाहीस्तव पो. स्टे. शिवाजीनगर नांदेड येथे जमा करण्यात आले आहे. सदर आरोपी रेकॉर्डवरील गून्हेगार असून त्याचेकडून आणखी गून्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदर कामगिरी मा. पोलीस अधिक्षक, श्री. चंद्रकिशोर मीणा व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश शिंदे, श्री. राजेंद्र सहाणे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री पी. डी. भारती, सपोनि श्री. विनोद दिघोरे, ASI रमेश खाडे, पोलीस हवालदार दत्ता वाणी, कूलकर्णी, व्यंकट गंगुलवार, शेख जावेद, शेख हिफजुर रहेमान, गजानन बयनवाड यांनी बजावली आहे.

पोलीस निरीक्षक
स्था.गु. शा. नांदेड

दिनांक :- ०५.०७.२०१८

**प्रेस नोट**

**“ महाराष्ट्रे शासनाने प्रतिबंधीत केलेला रजनीगंधा व गोवा गुटखा जप्त केले बाबत.”**

मा. पोलीस अधीक्षक श्री. चंद्रकिशोर मीणा, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश शिंदे यांनी जिल्हयातील गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी प्रभावी कारवाई करण्याबाबत दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. राजेद्र सहाणे यांनी विविध पथके तपार करुन त्यांना केलेल्या मार्गदर्शनाचे अनुषंगाने दिनांक ०४.०७.२०१८ रोजी रामेश्वर मारोतराव ठाकुर, मोहम्म्द इम्रान मोहम्मद अशरफ दोघे राहणार इतवारा नांदेड यांचे ताब्यातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला रजनीगंधा पान मसाला व गोवा गुटखा किंमती 5,38,350/- रुपयाचा जप्त करुन पोलीस स्टेशन इतवारा नांदेड येथे जप्ती पंचनामा, मुद्देमाल, दोन इसम लेखी रिपोर्टासह पोलीस स्टेशन इतवारा नांदेड येथे हजर केले आहे.

वरील कार्यवाही सपोनि. श्री.व्ही.ए.पल्लेवाड, पोना/2090 संजय पांढरे, पोकॉ/1349 ब्रम्हानंद लामतुरे, पोकॉ/3160 मोतीराम पवार, पोकॉ/3224 समीर अहेमद, मपोना/1401 विमल पोतदार, चापोकॉ/3082 बालाजी मुंडे यांचे पथकाने पार पाडली आहे.

**पोलीस निरीक्षक**
**स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड**